# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 28.10.2024 वार – सोमवार**

---

**वसूबारस**

आज दिवाळीचा पहिला दिवस, वसूबारस अर्थात, मातृस्वरूप गोमातेचं आणि तिच्या वासराचं पूजन दीपोत्सव पर्वात करण्याची प्रथा आहे. अनेक सार्वजनिक मंडळांतर्फे आज, सत्वस धेनूची, पूजेसाठी सोय करण्यात आली आहे.

**गडकोट**

भारतीय लोक शिवाजी महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यांवर गेले तर त्यापासून प्रेरणा घेऊन पुन्हा आपल्याशी लढतील आणि ती प्रेरणा त्यांना मिळू नये या उद्देशानं ब्रिटिशांनी महाराजांच्या गडकोटांची दुरवस्था केली असं मत श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे कार्यवाह सुधीर थोरात यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. दिवाळीनिमित्त माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात गड-किल्ले बांधणी स्पर्धेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या " छत्रपती शिवाजी महाराजांचं गडकोटांचं प्रशासन" या विषयावर ते बोलत होते. शिवाजी महाराजांनी त्यांच्या सागरी आरमाराची निर्मिती आजच्या वसुबारसदिवशी केली असल्याच्या अनुषंगानं प्रशालेत गाय आणि वासरू यांची पूजा करण्यात आली.

**कार्तिक**

मोहमायेतील गुरफटलेपण सोडून जागृत व्हा, नामस्मरणाचं महत्त्व जाणा, गुरुंची महती समजून घ्या, श्रद्धा जोपासून चैतन्याचा शोध घ्या, असं सांगणाऱ्या कार्तिक महिन्यातील काकडा याविषयी हरिभक्तपरायण अद्वैता उमराणीकर यांनी 'कार्तिक महात्म्य' या विषयावर पुण्यात कऱ्हाडे ब्राह्मण संघाद्वारे आयोजित प्रवचनात समजावून सांगितलं.

हरिपाठाचे जगणं आपल्या आचरणात यावं, असे सांगून उमराणीकर यांनी अक्कलकोट, शेगांव, गोंदवले, सज्जनगड, नृसिंहवाडी, शिर्डी, अमृतसर आदी भक्तिसंस्थानांमध्ये काकड्याची परंपरा कशी आहे, याविषयी माहिती दिली. काकड्यात सादर होणारी पंचपदी, भजन, आरती, गवळण, भारुड, जागल्या यांची ओळख करून दिली.

**<u>एमटीडीसी</u>**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळनं दिवाळीच्या सुटीत जास्तीतजास्त पर्यटक पर्यटनासाठी यावेत यासाठी विशेष सवलती जाहीर केल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक, शासकीय कर्मचारी, आजी आणि माजी सैनिक यांच्यासाठी विशेष सवलतींसोबत, प्रशिक्षित कर्मचारीवर्ग दिला आहे अशी माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक दीपक हरणे यांनी दिली. ज्येष्ठ नागरिकांसाठी 20 टक्के, शासकीय कर्मचाऱ्यांना आगाऊ नोंदणीसाठी 10 ते 20 टक्के तर, शालेय सहलींसाठी विशेष सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

**<u>स्वच्छ</u>**

'स्वच्छ' संस्थेकडून दिवाळीपूर्वी घरातील आवराआवर करताना पुनर्वापरयोग्य वस्तू संकलन करण्यासाठी राबविलेल्या उपक्रमातून ७३ टन वस्तू स्वच्छ संस्थेला प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये ४५ टन कपडे, पाच टन पुस्तकं, चार टन ईलेक्ट्रॉनिक कचरा, एक टन भांडी, चार टन खेळणी आणि अन्य साहित्याचा समावेश आहे. या वस्तू पुनर्वापर करण्यासाठी संकलित करण्यात आल्या आहेत.

**<u>प्रशिक्षण</u>**

पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात येणाऱ्या पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघात सरासरी मतदानाचं प्रमाण कमी असल्याचं मागील लोकसभा निवडणुकीत आढळून आल्यानं मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि निवडणूक निर्णय अधकारी यांच्याद्वारे संयुक्तपणे नव मतदारांना मतदानाचं आवाहन करण्यात येत आहे. प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयात मतदान जनजागृतीचा हा कार्यक्रम पार पडला. यामध्ये विद्यार्थ्यांना शंभर टक्के मतदानाची शपथ देण्यात आली.

**<u>नियुक्ती</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस -शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे प्रभारी शहराध्यक्षपदी अंकुश काकडे यांची  नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप हडपसर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत असल्यानं काकडे यांच्याकडं प्रभारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**<u>अर्ज</u>**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात आज ७ उमेदवारांनी एकंदर १० उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**<u>नेट</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची नेट पात्रता धारकांसाठी पीएचडी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यावर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पार पडलेल्या नेट परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत, त्यांच्यासाठी ही प्रवेश प्रक्रिया आहे. पाच नोव्हेंबर ही अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

**<u>आमंत्रण</u>**

मॉस्को इथल्या भारतीय दूतावासानं आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद दिवसाच्या सोहोळ्यामध्ये पुण्यातील वैद्य हरिश पाटणकर यांना विशेष निमंत्रित करण्यात आलं आहे. वैद्य पाटणकर गेली अनेक वर्षे विविध देशांमध्ये आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत. मॉस्कोतील सर्वात मोठ्या वनस्पतीशास्त्रीय उद्यानामध्ये येत्या मंगळवारी धनत्रयोदशीच्या दिवशी हा सोहोळा होत आहे.

**क्रिकेट-**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं पुण्यात सुरु असलेल्या 40 वर्षांवरील खेळाडूंच्या 'लीग ऑफ लिजंड्स करंडक १०० चेंडू क्रिकेट स्पर्धेत महेंद्र जगताप याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर फ्रेन्ड्स क्रिकेट क्लबनं रायगड वॉरीयर्सचा ५ गडी राखून पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला. अन्य सामन्यात संभाजी शिंदे यानं केलेल्या अचूक गोलंदाजीमुळं भाऊ कोकणे क्लबनं रेवेल विनर्सचा २ गडी राखून पराभव केला.

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. उद्या गडगडाटी पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे. कमाल तापमान 34 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**